(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XII / Issue – III ISSN 2277-8063

# ग्रामीण बाजारव्यवस्था

**डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके** कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी

---

**प्रस्तावना**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील कृषी अर्थव्यवस्था ही भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख अंग आहे. ग्रामीण भागात प्रमुख व्यवसाय शेती असून ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. शेती व्यवस्था बाजाराभिमुख झाली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली झाल्याने ग्रामीण बाजारव्यवस्था झपाट्याने बदलत आहे.

ग्रामीण जीवनात शेतकऱ्याला त्याच्या उत्पादित मालास योग्य भाव मिळाला तर सर्व बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण असते. शेतकऱ्यांना शासनामार्फत विविध सवलती दिल्या जात असून प्रशिक्षण व सहाय्य या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेतीला पाणी, सुधारित बियाणांचा पुरवठा, सुधारित शेती अवजारे पुरवठा, पंतप्रधान किसान सन्मान योजना, सोलर पंप योजना, माती परीक्षण, वीज सवलत अशा माध्यमातून शासन कृषी क्षेत्राला पाठबळ देत आहे. शेतीतील सुधारणा बरोबरच ग्रामीण बाजारपेठही आधुनिकतेकडे वाटचाल करत आहे.

शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या शेतीमालास योग्य बाजारपेठ उपलब्ध होणे महत्त्वाचे असते. शेतकऱ्याच्या शेतीमालास योग्य भाव व निर्यातीस प्रोत्साहन मिळाल्यास शेती क्षेत्रात व ग्रामीण जीवनात आर्थिक सुधारणांना वाव मिळतो. शेतीमालास हमीभाव अर्थात उत्पादन खर्च अधिक नफा मिळाल्यास ग्रामीण बाजारव्यवस्था मजबुतीने वाटचाल करते. नैसर्गिक आपत्ती, कमी बाजारभाव अशा परिस्थितीत त्याचा परिणाम ग्रामीण बाजार व्यवस्थेवर होत असतो.

ग्रामीण बाजार व्यवस्था जागतिक बदलांना स्वीकारत असून सकारात्मक बदल यांत्रिकीकरण यामुळे शहरी बाजारपेठाप्रमाणे ग्रामीण बाजारपेठा आधुनिकतेचा स्वीकार करत आहेत. वाहतूक व्यवस्थेतील सुधारणांमुळे शहरी बाजारपेठ व ग्रामीण बाजारपेठ यातील अंतर कमी झाले असून शेतीमालासह प्रक्रिया केलेला माल व इतर उत्पादनांची आवकजावक गतीने व सहजतेने होत आहे. शहरी बाजारपेठातील वस्तू आता सहजतेने ग्रामीण बाजारपेठात उपलब्ध होत आहेत. वाहतूक सुविधा, पार्किंग व्यवस्था यामुळे बाजारपेठ रस्त्याच्या दोन्ही बाजूने विस्तारत आहे. वाहतुकीची सहज व सुलभ उपलब्धता हा बाजार व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनला आहे.

**कृषी बाजारव्यवस्था**

ग्रामीण जीवनात लोकांचा शेती हाच मुख्य आधार आहे. हवामान व त्या त्या विभागातील पीक परिस्थिती या आधारित येथील कृषी जीवन चालू असते. कृषी जीवनात इतर क्षेत्राप्रमाणे सहज बदल होत असून इतर क्षेत्रातील प्रगतीचा परिणाम कृषी क्षेत्रात दिसत आहे. शेतीची मशागत, उत्पादकता, शेतीमालाचे पॅकिंग, वाहतूक, शेतीमालाची बाजारपेठ या सर्व क्षेत्रात यांत्रिकीकरण, संगणकीकरण या माध्यमातून विकासाचा मार्ग निर्माण झाला आहे. जनावरांच्या साह्याने शेतीची मशागत ते सर्व प्रकारची यंत्रे व ड्रोन यांचा, वापर सुधारित बी-बियाणे, पाणीपुरवठ्याच्या नवीन योजना, सोलर पंप, शेतीमालावरील प्रक्रिया उद्योग या आधारे कृषी व्यवस्था वाटचाल करत आहे.

ग्रामीण जीवनसमृद्ध होण्यासाठी कृषी व्यवस्था मजबूत झाली पाहिजे. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादन खर्चाच्या आधारे, त्याला शेतीत समाधान वाटेल असा शेतीमालास बाजारभाव मिळाला पाहिजे. ग्रामीण समाज विशेषतः शेतकरी खूप कष्ट करतो पण शेतीमालाचा भाव व इतर महागाई या विसंगत परिस्थितीमुळे त्याचे जीवन त्रासदायक झाले आहे. शेतीसाठी पशुधन सांभाळणे, नवीन बियाणे खरेदी करणे, यांत्रिकीकरणाचे वाढणारे दर, मजुरी या कारणाने शेती उत्पादनाचा खर्च नियमितपणे वाढत आहे.

शेती उत्पादनासाठी आवश्यक भांडवल कर्जरूपाने उभा करताना अनेक घटक शेतकऱ्यांचे लुबाडणूक करतात. सावकारी कर्ज, भिशी कर्ज, सहकारी व खाजगी बँका, राष्ट्रीयीकृत बँका या साऱ्या यंत्रणा शेतकऱ्याला गुलाम बनवत असून आपण अतिरिक्त व सुरक्षित उत्पन्न मिळवत राहतात. सातत्याने कष्ट करत राहणाऱ्या शेतकऱ्याच्या मानसिकतेवर, कौटुंबिक परिस्थितीवर या बाबी प्रहार करत राहतात. शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या अनेक योजना कागदोपत्री शेती व शेतकरी हिताच्या वाटत असल्या तरी अनेक योजनांचा लाभ घेत असताना सामान्य शेतकरी सरकारी यंत्रणांच्या जाचाला कंटाळून जातो.

**उत्पादन विक्रीव्यवस्था**

शेतीमाल उत्पादित केल्यानंतर शेतकऱ्याला त्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे उत्पादित माल लगेच विक्री करावा लागतो. त्याचा लाभ व्यापारी. भांडवलदार. साठवणूकदार लोक व व्यवस्था उठवितात. शेतीमाल उत्पादनानंतर सर्वत्र एकाच

वेळी बाजारात उपलब्ध होत असल्याने त्याचा खरेदी भाव कमी केला जातो. शेतीमालाची सरस निरस प्रतवारी करण्याचे कौशल्यशेतकऱ्यांना प्राप्त नसल्याने, एकत्रित माल विकल्याने त्याच्या पिकाला भाव कमी मिळतो. शेतकरी समूहाकडे चांगली साठवणूक व्यवस्था नसल्याने व्यापारी व साठवणूकदार शेतीमाल खरेदी करतात व वर्षभर चढ्यादराने त्याची विक्री करतात. त्याचा लाभ शेतकरी वर्गाऐवजी व्यापारी व भांडवलदार वर्गास होतो.

शेतकऱ्याला मजबुतीने उभा करताना त्याला शेतीसाठी कमी व्याजदराने व सुलभतेने भांडवल उपलब्ध केले पाहिजे. ग्रामीण भागातील साठवणूक व्यवस्थेची साखळी मजबूत केली पाहिजे. शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध करताना त्याला शेतीमालाची प्रतवारी, आकर्षक व ग्राहकाभिमुख पॅकेजिंग यांचे ज्ञान दिले पाहिजे. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळायचा असेल तर शेतकरी संघटित झाला पाहिजे. त्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाला भाव ठरवण्याचा अधिकार हा शेतकऱ्याकडे राहिला पाहिजे. उत्पादन खर्चाच्या आधारे शेतीमालास हमीभाव देण्याचीजबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे. शेतीमालाची विक्री व्यवस्था होत असताना शेतकऱ्याची होणारी लुबाडणूक हे शेतकऱ्यांच्या गरिबीचे प्रमुख कारण आहे.

नैसर्गिक आपत्तीचा सामना करत शेतकरी शेती उत्पादन घेत असताना, त्याला शेतीत समाधान वाटेल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. वाढणाऱ्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा, औद्योगिक विकासासाठी प्रामुख्याने कच्चामाल पुरविणारा शेतकरी आनंदी असणे ही शासन व समाजाची जबाबदारी आहे.

भारतातील शेतकरी, कृषी वैज्ञानिक, शासकीय धोरणे, खरेदी-विक्री व्यवस्था व शेती संरचना यांचे परस्पर सहकार्याने हरितक्रांती यशस्वी झाली आहेत. जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेत मागणी व पुरवठा या बाबी बाजारपेठेचे स्वरूप ठरवितात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली झाल्यामुळे शेती व्यवसाय बाजाराभिमुख झाला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतमालास योग्य भाव मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांचा माल योग्यरीतीने विक्री केला जावा,त्याची फसवणूक होऊ नये शेतकऱ्याकडून चांगल्या दर्जाचे शेती उत्पादन घेतले जावे अशी परिस्थिती निर्माण व्हावी. शेती उत्पादन वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. पर्यायाने उद्योगधंदे व कारखानदारीत वाढ होण्याबरोबरच रोजगार निर्मितीस चालना मिळते. शेतीव्यवसायाच्या वाढीमुळे देशाची आर्थिक प्रगती व विकास घडून येतो.

ग्रामीण बाजारव्यवस्था मजबूत करण्यासाठी शेतकरी हिताची धोरणे प्रामाणिकपणे राबविण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, सहकारी संस्था यांनी घेतली पाहिजे. ग्रामीण बाजारव्यवस्थेच्या सक्षमीकरणावर ग्रामीण विकास अवलंबून आहे. ग्रामीण विकासाला गती मिळेल तेव्हा शहरीकरणावरील ताण कमी होईल.

**ग्रामीण बाजार**

ग्रामीण भागात आठवडा बाजार भरतात. आठवड्यातील एका निश्चित दिवशी बाजार भरतो. प्रमुख गाव व त्याच्या शेजारील लहान गावे वाड्य-वस्त्यांमधील लोक भाजीपाला व जीवनावश्यक वस्तू खरेदी करतात. वेगवेगळया क्षेत्रातील कामगार वर्गही साधारणपणे बाजारादिवशी आठवड्याची सुट्टी घेतात. या आठवडी बाजारामध्ये लोकांना जीवनावश्यक सर्व वस्तू एकाच ठिकाणी एकाच दिवशी उपलब्ध होतात ५०ते १००किलोमीटर अंतरातील किरकोळ व्यापारी या बाजारात नियमितपणे आपला माल विक्रीसाठी उपलब्ध करतात. त्यांची त्या बाजारातील बसण्याचीजागा निश्चित असते अनेक वर्षे व्यापारात असलेल्या व्यापाऱ्यांचा विश्वास संपादन केलेले ग्राहक आहेत सामान्य लोकांसह साधारणतः सर्व नागरिक आठवडाभर लागणारा भाजीपाला व इतर वस्तू या बाजारात खरेदी करतात नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार व पैशाच्या उपलब्धतेनुसार किरकोळ व सुट्ट्या बाजार या बाजारात उपलब्ध होतो या बाजाराची व्यवस्था नियोजन व स्वच्छता स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत केली जाते आधुनिक बाजार व्यवस्था उपलब्ध असतानाही परंपरेने आणि विश्वासाने चालत आलेले आठवडी बाजार लोकप्रिय आहेत.

**लहान व्यापारी**

ग्रामीण भागात पूर्वी किराणा मालाचे दुकान असावयाचे. तो दुकानदाराच सर्व प्रकारचा माल अगदी जनरल औषधेही लोकांना उपलब्ध करत असे. सामान्य माणसांना उधारीवर माल उपलब्ध करून देणारे दुकानदार गरिबांना जगण्याचा आधार वाटत.कालानुरूप ग्रामीण भागात किराणामाल, स्टेशनरी,बेकरी,कोल्ड्रिंक्स,कापड दुकान,चप्पल दुकान,मोबाईल शॉपी,एकत्रित बाजार,हार्डवेअरसह वाहनांची शोरूम असा बाजारपेठेचा विस्तार होत असून शहरी बाजारपेठ व ग्रामीण बाजारपेठ यातील अंतरकमी होत आहे.शहरातील मोठे व्यापारी ग्रामीण भागात आपल्या शाखा निर्माण करत आहेत. ग्राहक आपल्या जवळच्या बाजारपेठेला प्राधान्य देत असून ज्वेलरीसह सर्व प्रकारचे व्यवसाय ग्रामीण विभागातही स्थिरावत आहेत.खाद्यसंस्कृतीही आपला व्यवसाय विस्तारित असून चहा,कॉफी, खाद्यपदार्थ,जेवण यासाठी लहान-मोठे

व्यवसायिक ओळख निर्माण करत आहेत. वाहन उद्योगातील उपलब्धतेमुळे अनेक व्यावसायिक सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी व्यावसायिक वाहनांचा वापर करत आहेत.वाहनांमध्ये व्यवसायासाठी आवश्यक रचना करून गावोगावी फिरून व्यवसाय करणाऱ्यांची संख्या वाढत आहे.वाहनातून केला जाणारा व्यापारही लोकप्रिय होत असून आवश्यक वस्तू ग्राहकांना स्वतःच्या दारात उपलब्ध होत आहेत. ग्रामीण भागात लहान व्यापारीही आपला व्यापार आधुनिक पद्धतीने ग्राहकाभिमुख करत आहेत.

एकत्रित बझार

ग्रामीण भागातही शहरी बाजारपेठाप्रमाणे एकत्रित बझार ही संकल्पना यशस्वी होत आहे.सर्व प्रकारचा जीवनावश्यक्य वस्तूंचा एकत्रित बझार,त्याचीसुबक मांडणी,ग्राहकाने बाजारात फिरून आवडेल तो माल ट्रॉलीतून खरेदी करणे,संगणकीकृत बिल,बिलामध्ये छापील कमाल किरकोळ किमतीत भरघोस सूट,अत्याधुनिक व्यवस्था व सुविधा यामुळे हे बझार अल्पावधीत ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहेत.लोकांना कमी वेळेत आपल्या पसंतीनुरूप बाजार करता येत असल्याने ही बाजार संस्कृती झपाटयाने विकसित होत आहे.मोठे उद्योग समूह या क्षेत्रात आपली गुंतवणूक वाढवत आहेत.त्याचबरोबर ग्रामीण भागातही नवीन तरुणांनी या क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे.

ग्रामीण भागात खाद्यसंस्कृतीही आपले अस्तित्व भक्कम करत आहे.लहान गाड्यांवरून खाद्य विक्री करणारे विक्रेते,आईस्क्रीम विक्रेते ग्रामीण बाजारपेठेत व्यवसाय करत आहेत.राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील खाद्य,शीतपेये व इतर उत्पादने आपला ब्रँड ग्रामीण भागात वितरीत करत आहेत. त्यांनी आपली वितरण साखळी विस्तारण्याचे काम केले आहे.स्टेशनरी साहित्य,सौंदर्यप्रसाधने या सर्व प्रकारची उत्पादने ग्रामीण बाजारपेठेत उपलब्ध झालीआहेत.

**वैद्यकीय व्यवस्था**

शहरी भागासह मोठ्यागावांमध्येअसलेली आरोग्य सुविधा अलीकडे विस्तारत ग्रामीण भागातही पोहोचली आहे.लहान दवाखाने, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र,आशा सेविका,लहान-मोठी औषध दुकाने अशी ग्रामीण भागात आरोग्य सेवा उपलब्ध झाली आहे.वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा, रुग्णवाहिकांची सहज उपलब्धता यामुळे नागरिकांना तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध होत आहे. लोकांना वेगवेगळ्या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून तपासणीची सुविधा उपलब्ध होत आहे. शासनाचे आरोग्य उपक्रम,सामाजिक संस्थांकडून आरोग्य शिबिरे,सेवाभावी संस्थांचे दवाखाने याद्वारे सामान्य लोकांना उपचार सेवा मिळत आहे.आरोग्यविषयक जागरूकता वाढत असून त्यातून लोकांचे जीवन सुखकर होत आहे.आधुनिक उपचार पद्धतीने लोकांचे जीवनकमी वेदनादायी करण्यात वैद्यकीय व्यवस्था यशस्वी होत आहे.

**शिक्षण व्यवस्था**

अलिकडच्या काळात शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था सजग होत आहे.लोकांमध्येशिक्षणाचे महत्त्व वाढीस लागत असून लोक प्राथमिक,माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी मुलांना प्रोत्साहित करत आहेत.तंत्रज्ञानाचा वापर सर्वत्र वाढला असून शिक्षण अधिक सोपे,सुलभ व उपक्रमशील होत आहे.सर्व क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थी यशस्वी होत आहेत.वाहतूक व्यवस्थेतील प्रभावी सुधारणांमुळे ग्रामीण विद्यार्थी शहरी भागातील नामांकित संस्थेत शिक्षण घेत आहेत.

**दळणवळण सुविधा**

रस्ते व वाहतूक क्षेत्रातील सुधारणामुळे शहरी व ग्रामीण जीवन दिवसेंदिवस अधिक सहज सुलभरीतीने परस्पर सहकार्याने एकमेकांशी जोडले जात आहे.ग्रामीण भागातील उत्पादित कृषी माल जलद गतीने शहरी बाजारपेठामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होत आहे.खते,बी-बियाणे,शेती अवजारे व यांत्रिकी साहित्य शहरातून ग्रामीण भागात वाहतुकीच्या माध्यमातून जलदगतीने उपलब्ध होत आहे. चांगले रस्ते, वाहतूक सुविधा या माध्यमातून ग्रामीण विकासात चांगले सकारात्मक बदल जाणवत आहेत.

**पाणीपुरवठा व्यवस्था**

मोठे धरण प्रकल्प मध्यम पाटबंधारे प्रकल्प लघु पाटबंधारे प्रकल्प तलाव बंधारे कालवे सिंचन योजना या माध्यमातून हरित क्रांतीसह कृषी प्रक्रिया उद्योग क्षेत्र ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण ठरले आहे शेती पाणीपुरवठा व पिण्याचे पाणीपुरवठा या दोन्ही क्षेत्रात विद्युत पुरवठा सौर ऊर्जा पाणीपुरवठा मोटर पंपपाईपलाईन यामधील सुधारणांनी क्रांतिकारक बदल केले आहेत ठिबक सिंचन तुषार सिंचन यासह पाणीपुरवठा क्षेत्रातील तंत्रज्ञानाने लोकांचे क्षण कमी करण्यात योगदान दिले आहे प्राणी प्रकल्पांनी शेतीसह पिण्याचे पाणी उपलब्ध करतानाच ऊर्जा निर्मिती क्षेत्रातील भरीव मदत झाली आहे ग्रामीण विकासात सर्व क्षेत्रातील संशोधनाचा वैज्ञानिक प्रगतीचा लाभ झाला आहे ग्रामीण बाजार व्यवस्था समृद्ध करण्यात

कृषी क्षेत्र रस्ते वीज पाणी शिक्षण आरोग्य वाहतूक व्यवस्था यांचा समावेश आहे सर्व क्षेत्रातील प्रगती ग्रामीण बाजार व्यवस्था विकसित करत आहे.

**शिफारसी**

१) ग्रामीण बाजार व्यवस्था मजबूत करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीमालाला योग्य बाजारभाव हमीभाव मिळाला पाहिजे

२) शेतकऱ्यांना सहज भांडवलाची उपलब्ध होणेकामी अर्थपुरवठा साखळी पारदर्शक व मजबूत केली पाहिजे.

३) शेतीमालाची साठवणूक व्यवस्था ग्रामीण भागात उपलब्ध केली पाहिजे.

४) शेतीमालाचे चांगले उत्पादन, शेतीमालाची प्रतवारी व पॅकेजिंग या कामी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जावे.

५) आठवडा बाजारांना प्रोत्साहन व सुविधा दिल्या जाव्यात.

६) लहान व्यापाऱ्यांना कमी व्याज दराने भांडवल पुरवठा केला जावा.

७) ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधा पुरविताना सामान्य लोकांना मोफत उपचार सुविधांमध्ये वाढ करावी.

८) आरोग्य यंत्रणांवर शासनाचे जनहित कारक नियंत्रण असावे.

९) ग्रामीण शिक्षणातील सुविधा, क्रीडांगण यासाठी शासन व समाजस्तरावर सकारात्मक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

१०) शेतरस्ते, ग्रामीण रस्ते यातील सुधारणा ग्रामीण बाजार व्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक आहेत.

११) शहरांमध्ये शेतकरी-ग्राहक बझार तसेच महिला बचत गटांनी उत्पादित केलेली उत्पादने यासाठी चांगली विक्री व्यवस्था उपलब्ध करावी.

१२) ग्रामीण भागात कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देऊन रोजगार निर्मिती केली जावी.

१३) पशुधन वाढीसाठी शासनस्तरावर प्रयत्न करून नैसर्गिक शेती व आरोग्यासहितकारक शेतीमाल उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन द्यावे.

१४) शेती सुधारणांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांमधील शासकीय कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप कमी करून त्या सहजतेने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या पाहिजेत.

**संदर्भसूची**

१) प्रा. किल्लोळ जगदीश, पृष्ठाधार साहित्य, धनंजयराव गाडगीळ सहकारी संस्था, नागपूर. मार्च २००२

२) मा. सरव्यवस्थापक, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे – ३७

३) रौप्य महोत्सव गौरव ग्रंथ, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.१९७०

४) महात्मा ज्योतिबा फुले, शेतकऱ्यांचा आसूड, संस्कृती प्रकाशन, पुणे.